प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)

(०२३५८) २८२३८७

अंक ७५/२०१९ दिनांक १७/०९/२०१९ कालावधी ५ दिवस


| डॉ. प्रशांत बोडके, | डॉ. विजय मोरे, | डॉ. शितल यादव, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०७/०९/२०१९ ते १३/०९/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १८/०९/२०१९ सकाळी ८:३० पासून २२/०९/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११/०९ | १२/०९ | १३/०९ | १४/०९ | १५/०९ | १६/०९ | १७/०९ | | १८/०९ | १९/०९ | २०/०९ | २१/०९ | २२/०९ |
| ९.० | ०.० | ७४.० | ७७.० | ५९.० | ३१.० | - | पाऊस (मिमी) | १० | २० | ६५ | २७ | ४३ |
| ३०.१ | २९.२ | २९.३ | ३१.४ | २९.३ | ३०.० | - | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३३ | ३५ | ३२ | ३३ |
| २४.५ | २४.८ | २३.७ | २५.१ | २३.८ | २४.२ | - | किमान तापमान (अं.से) | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ८ | ८ | ८ | ८ | ७ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९७ | ९६ | ९८ | ९८ | ९६ |
| १०० | ९९ | - | १०० | १०० | ९३ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ७९ | ७५ | ७४ | ८६ | ७३ |
| २ | ४ | १ | ३ | १ | १ | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ३ | ३ | ४ | ४ |
| नै.द. | नै.द. | नै. | नै.द. | आ.द. | आ.पु. | - | वाऱ्याची दिशा | द. | द. | नै.द. | द. | नै.प. |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १८ ते २२ सप्टेंबर,२०१९ पर्यंत मध्यम ते जास्त स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता तसेच कमाल तापमानात वाढ संभवत असून आकाश मेघाच्छादित राहील.**

**दिनांक २० ते २६ सप्टेंबर,२०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | पोटरी ते फुलोरा अवस्था | • भात पिक पोटरी ते फुलोरा अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें.मी.पर्यंत नियंत्रित करावी.<br>• निमगरवे भात पिक फुलोऱ्या अवस्थेत असल्याने नत्र खताची तिसरी मात्रा ४३ किलो युरिया प्रती हेक्टर या प्रमाणात पाऊसाचा अंदाज घेवून देण्यात यावी.<br>• भात पिकावर खोड किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडीच्या नियंत्रणासाठी कारट्याप हायड्रोक्लोराईड ४ जी कीटकनाशक २१.८ कि.ग्रॅ. प्रती हेक्टरी या प्रमाणात जमिनीत पुरेशी ओल असताना देण्यात यावे.<br>• आर्द्रतेत होणाऱ्या वाढीमुळे भात पिकावर कडा करपा ह्या जीवाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. कडा करपा रोगामुळे पानांचे शेंडे आणि कडा पिवळसर रंगाच्या होतात व रोगग्रस्त रोपांची पाने कडेकडून मध्य शिरेच्या दिशेने करपतात. सकाळच्या वेळेस पानांच्या खालच्या बाजूला दुधाळ रंगाचे दवबिंदू साचलेले दिसून येते. रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी स्टेप्टोसायक्लीन ५ ग्रॅम आणि कॉपर ऑक्सिक्लोराईड २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यामध्ये मिसळून एकत्रित फवारणी करावी. पुढील दोन फवारण्या १५ दिवसांच्या अंतराने घ्याव्यात. (सदर बुरशीनाशके लेबल क्लेम नाहीत). |
| आंबा | पालवी | • वाढत्या तापमानामुळे आंब्याला पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण असल्याने कोवळ्या पालवीचे तुडतुड्यापासून पासून संरक्षण करण्यासाठी डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही ९ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| नारळ | - | • नारळातील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्यात दर दोन महिन्यांनी क्लोरोपायरीफॉस २० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. काडीकचरा वेचून नारळाची बाग स्वच्छ ठेवावी. |
| भाजीपाला पिके | फलधारणा | • ढगाळ वातावरण व आर्द्रतेमुळे वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये केवडा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी रोगग्रस्त पाने काढून नष्ट करावीत व मॅन्कोझेब किंवा झायनेब २.५ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. |
| फळबाग रोपवाटिका | -- | • बुरशीजन्यरोगाच्या प्रतिबंधासाठी फळबाग रोपवाटिकेतील कलमांना ०.२% कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून प्रति रोपाच्या पिशवीत ५० मि. ली. बुरशीनाशकाचे द्रावण ओतावे. |

**टीप: फवारणी ३ ते ४ तासांची पाऊसाची उघडीप असताना करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**